Lok Mahavidyalaya Wardha
Session 2018-19

Study Material
Class M.A. II (Eco) Sem IV
Subject : Economic Growth and Development

# आर्थिक विकासात उद्योगांची भूमिका.

अल्प विकसीत देशांच्या आर्थिक विकासात औद्योगिकरणाचा एक महत्वपुर्ण भूमीका असते. अल्पविकसीत देश कृषिप्रधान बनल्यामुळे केवळ उपभोग्य वस्तुंची संबंधीत काही उद्योग असतात, अशा देशांमध्ये औद्योगिकरणाशिवाय कृषी, वाहतुक, दळणवळण, रोजगारी निर्मीती, इत्यादी क्षेत्र विकसीत करणे शक्य होत नाही. त्यासाठी औद्योगिकरणाची आवश्यकता आहे. औद्योगिकरण, अल्पविकसीत देशांच्या आर्थिक विकासात खालील वेगवेगळ्या कारणांमुळे प्रमुख भूमीका पार पाडते.

**१) कृषिसाठी साधनांचा पुरवठा –**

अधिक लोकसंख्या असलेल्या देशात भूमीवर अधिक लोकसंख्येचा भार पडतो. त्यामुळे शेतजमिनीचे उपविभाजन व अपघटन होते. त्याचप्रमाणे कृषि परंपरागत पध्दतीने केली जाते. अशा परिस्थीतीत देशात अन्नधआन्य व इतर उत्पाददनात स्वयंपुर्णता आणण्याकरीता आणि कृषिची उत्पादकता वाढविण्यासाठी खते, किटकनाशके, उच्च प्रतीची बियाणे, आधुनिक तंत्रे, इतर उत्पादनाच्या पुर्ततेकरीता औद्योगीकरण विकास सुरु करणे आवश्यक आहे.

**२) रोजगार प्रदान करणे –**

कृषि क्षेत्रामध्ये असलेले सुप्त बेकारांना त्याचप्रमाणे बेरोजगारांना रोजगार प्रदान करण्यासाठी औद्योगिकरण अत्यंत आवश्यक आहे. कृषि क्षेत्रातील ज्या सुप्त बेकारांची सिमांत उत्पादकता शुन्य किंवा अत्यंत कमी असते अशा श्रमीकांना कृषी मधून उद्योगात स्थानांतरीत करता येणे शक्य असते. कारण कृषीच्या तुलनेत उद्योगांमध्ये श्रमीकांची सिमांत उत्पादकता जास्त असते. म्हणून अशा कामगारांना औद्योगिक क्षेत्रात स्थानांतरीत केल्यास एकुण उत्पादन वाढेल. म्हणून अति लोकसंख्या असलेल्या अल्पविकसीत देशांसाठी औद्योगिरणाशिवाय अन्य दुसरा पर्याय नाही.

**३) भांडवलात वाढ :-**

अल्पविकसीत देशात भांडवलाची कमतरता असते. म्हणून अल्पविकसीत देशांसाठी औद्योगिकरण आवश्यक आहे. औद्योगिकरणामुळे योग्य प्रमाणात उत्पादकांच्या बचती, प्राप्त होतात. त्यामुळे भांडवलात वाढ होते. भांडवलातील वाढीमुळे छोटे व मोढे उद्योग स्थापन होत नसून कृषीचे आधुनिकीकरण होते. त्यामुळे कृषीच्या उत्पादनात वाढ होते. कृषिमधील नवप्रर्वतन व तांत्रीक सुधारणामुळे सर्व साधनांची उत्पादकता वाढते. हे सर्व औद्योगिकरणामुळे शक्य आहे.

**४) कृषीचे व्यापारीकरण -**

औद्योगिकरणामुळे कृषिचे व्यापारीकरण होते. कृषीचे व्यापारीकरण म्हणजे कृषीला उद्योगाइतके लाभदायक बनविणे होय. ज्यामुळे कृषीमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारांची मागणी पूर्ण करण्याची क्षमता राहते. कृषीच्या आधुनिकीकरणामुळे शेतीच्या ऐवजी व्यापारी शेती सुरु होते. वाहतुक व दळणवळण साधनांचा विकास होतो.

**५) व्यापार अटीमध्ये सुधारणा -**

अल्प विकसीत देशांच्या कृषी वस्तुंच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील उच्याटनामुळे त्यांच्या व्यापारस्तरामध्ये प्रतिकुलता निर्माण होते. या व्यापार अटीमध्ये सुधारणा करण्यासाठी औद्योगिकरण आवश्यक आहे. अल्प विकसीत देश मुख्यतः कृषि वस्तुंची निर्यात करतात, व औद्योगिकरण वस्तुंची आयात करतात, विकसीत देशांच्या संरक्षण वाढी धोरणामुळे कृषी वस्तुंच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कमी होतात. व औद्योगीक वस्तुंच्या किमंती वाढतात.

**७) शहरी रोजगारात वाढ -**

औद्योगिरणामुळे शहरात रोजगार वृध्दी होते. कारण औद्योगिकरण क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या त्याचप्रमाणे विविध कौशल्याचा वापर केल्यामुळे उद्योगामध्ये नफा वाढतो. त्यामुळे बचतीही वाढते. व वस्तु आणि सेवांची मागणी सुध्दा वाढते व नंतर गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळून रोजगारात वाढ होते.

**८) विविध वस्तु व सेवांचा उपयोग -**

औद्योगिकरणामुळे लोक विविध प्रकारच्या वस्तुंचा व सेवांचा उपयोग घेतात शहरी लोकांचा प्रभाव म्हणून ग्रामीण लोक ही अनुकरणाद्वारे आनंद घेतात, अशाप्रकारे औदयोगिकरण जिवनमानाचा स्तर वाढविते, तसेच सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन देते.

**९) सामाजिक परिवर्तन :-**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत औद्योगिकरण सामाजिक समानता सामाजिक परिवर्तन उत्पन्नाचे अधिक न्यायपूर्ण वितरण आणि सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन होते.

**१०) तिव्र आर्थिक विकास :-**

विकसीत देशांच्या अनुभवातून औद्योगिकरण हे तीव्र आर्थिक विकासासाठी एक पूर्ण आवश्यक

घटक आहे. विकासासाठी राष्ट्रीय उत्पन्नातील औद्योगिक क्षेत्राचा हिस्सा वाढून कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी झाला पाहिजे , हे केवळ नियोजीत औद्योगिक धोरणाद्वारेच शक्य होऊ शकते. या धोरणामुळे कृषी व सेवा क्षेत्रांच्या विकास ही होऊ शकतो.

**मुल्यमापन –**

उत्पादनाच्या विकासाच्या प्रारंभीक अवस्थेत अल्पविकसीत देशांनी स्विकारलेल्या औद्योगिककरणाच्या धोरणामुळे अपेक्षीत आर्थिक व सामाजिक लाभ झालेला नाही हे धोरण उत्पन्न व संपत्तीच्या वितरणातील असमानता, बेरोजगारी, आणि प्रादेशिक संतुलन कमी करण्यास असमर्थ राहीले आहे. या व्यतिरीक्त औद्योगिकरणाला काही गंभीर समस्या निर्माण केलेल्या आहेत.

उदा. ग्रामीण गतीहिनता, शहरीकरण, वर्गाची अचानक वाढ, विकासा सोबत आवश्यक असलेल्या शिक्षणाचा अभाव, सरकारी नौकरांची प्रगती व लोकसंख्येची वेगाने होणारी वाढ.

म्हणूनच अर्थशास्त्रज्ञ अशा मतांकडे बनलेले आहेत की केवळ औद्योगिकरणामुळे विकास सुरु करणे आवश्यक नाही तर विकास प्रक्रिया कृषी व उद्योगाच्या सुव्यवस्थीत वाढीसोबत जोडली आहे. वास्तविकपणे जास्तीत जास्त अल्पविकसीत देसात कृषि विकासाद्वारेच यशस्वी औद्योगिकरण करण्यात आलेले आहे.